# मिरा भाईदर महानगरपालिका

**मुख्य लेखापरीक्षक यांचे कार्यालय**

स्व.इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र. 28192828

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/मु.ले.प./ ०५७ /2023-24 दि. ५ /०९ /2023

## // परिपत्रक //

**विषय:- आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत अंदाजपत्रके, दाखले व अनुषंगिक कामांबाबत**

**संदर्भ:- 1) नियोजन विभाग शासन निर्णय क्र.स्थाविका-616/प्र.क्र.96/का.1482 दि.12/07/2016**

**2) जिल्हा नियोजन समिती ठाणे यांचे पत्र क्र. जा.क्र. जिनिस/आस्थाविका/2023-24 दि.25/08/2023**

उपरोक्त संदर्भिय जिल्हा नियोजन अधिकारी ठाणे यांनी त्यांचे पत्रान्वये स्थानिक विकास कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार कार्यान्वयीन यंत्रणेने मा. आमदार महोदयांनी प्रस्तावित केलेल्या कामाची अंदाजपत्रके तयार करुन तांत्रिक मान्यता व आवश्यक कागदपत्रांसह जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे. तसेच सदर काम हे शासनाच्या प्रचलित नियमानुसार करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही कार्यान्वयीन यंत्रणेची असुन कार्यान्वयीन यंत्रणा ही योजनेच्या अमंलबजावणी संदर्भात उद्भवणा-या प्रशासकीय / न्यायालयीन प्रकरणांसाठी जबाबदार असल्याचे नमुद करण्यात आले आहे. या अनुषंगे जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्यात येत असलेल्या अंदाजपत्रकांत खालीलप्रमाणे त्रुटी निदर्शनास येत असल्याचे नमुद केले आहे.

1) अंदाजपत्रकांवर सक्षम अधिकारी यांचे स्वाक्षरी नसणे, तांत्रिक मंजुरी क्रमांक, दिनांक नमुद न करणे.

2) कामाच्या ठिकाणची भौगोलिक परिसिमनांची छायाचित्रे (GEO-TAGGING) कामाच्या नावासहीत नसणे, त्यावर स्वाक्षरी व शिक्का नसणे.

3) कामासोबत सादर करावयाचे दाखले त्रोटक असणे, याकरीता आवश्यक दाखल्यांच्या नमूना यासोबत पाठविण्यात येत असून सदर नमुन्यातच यापुढे दाखल्यांसह अंदाजपत्रके सादर करावीत.

4) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीत आस्थाविका अंतर्गत कामे इतर कार्यान्वयीन यंत्रणेमार्फत (सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व इतर) करण्यात येते असल्यास अशा वेळी सदर कार्यान्वयीन यंत्रणांनी स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र

जोडूनच कामाची अंदाजपत्रके सादर करावीत. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनीदेखील सदर कामाची ना-हरकत प्रमाणपत्र जोडुनच कामाची अंदाजपत्रके सादर करावीत. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थानीदेखील सदर कामाची ना-हरकत प्रमाणपत्रे प्राथम्याने सदरील कार्यान्वयीन यंत्रणेस उपलब्ध करून दयावी.

5) निधी मागणी करतांनादेखील मागणीपत्रावर दिनांक, जावक क्रमांक स्वाक्षरी नसते. यास्तव निधी मागणी करतांना मा आमदार महोदयांचे नाव, कामाचे ना, प्रशाराकीय मंजूरी क्रमांक, सदर कामास यापुर्वी प्राप्त निधी. त्यापैकी समर्पित निधी, काम पूर्णत्वाचा दाखला, कामाच्या ठिकाणची भौगोलिक परिसिमनांची छायाचित्रे (geo-tagging), संदर्भिय शासननिर्णयाच्या परिशिष्ठ क्र.४ मधील विहित नमुन्यातील फलकाचे छायाचित्रे जोडून सादर करावीत.

तरी सर्व विभाग प्रमुख यांना सुचित करण्यात येते की आमदार स्थानिक विकास कार्यक्रमंतर्गत अंदाजपत्रके, दाखले व अनुषंगिक कामे यांचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करतांना तसेच मुलभुत सुविधा, मनपा क्षेत्रातील विकास व कामांचा प्रस्ताव सादर करताना वरीलप्रमाणे त्रुटी राहणार नाहीत याबाबत दक्षता घेण्यात यावी.

(सुधीर नाकाडी)
मुख्यलेखापरीक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,

1) शहर अभियंता
2) सर्व विभाग प्रमुख / खाते प्रमुख
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव

1) मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका
2) मा. अति. आयुक्त (1) व (2), मिरा भाईंदर महानगरपालिका

महाराष्ट्र शासन
जिल्हा नियोजन समिती,
जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे

ई-मेल : dpothane@gmail.com
दूरध्वनी : (०२२) २५३४४२१३

जा.क्र. जिनिस/आस्थाविका/२०२३-२४/ 	दिनांक : २५/०८/२०२३

प्रति,

कार्यान्वयीन यंत्रणा (सर्व)

विषय -- आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत अंदाजपत्रके,दाखले व अनुषंगिक कामे
संदर्भ - नियोजन विभाग शासन निर्णय क्र.स्थाविका-६१६/प्र.क्र.९६/का.१४८२, दि.१२/७/२०१६

नियोजन विभागाच्या आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार कार्यान्वयीन यंत्रणेने मा.आमदार महोदयांनी प्रस्तावित केलेल्या कामाची अंदाजपत्रके तयार करून तांत्रिक मान्यता व आवश्यक कागदपत्रांसह जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे. तसेच सदर काम हे शासनाच्या प्रचलित नियमानुसार करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही कार्यान्वयीन यंत्रणेची असून, कार्यान्वयीन यंत्रणा ही योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात उद्भवणाऱ्या प्रशासकीय/न्यायालयीन प्रकरणांसाठी जबाबदार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्यात येत असलेल्या अंदाजपत्रकांत वारंवार खालील त्रुटी आढळून येत आहे.

१. अंदाजपत्रकांवर सक्षम अधिकारी यांचे स्वाक्षरी नसणे, तांत्रिक मंजूरी क्रमांक, दिनाक नमूद न करणे
२. कामाच्या ठिकाणची भौगोलिक परिसिमनांची छायाचित्र(GEO- TAGGING) कामाच्या नावासहीत नसणे, त्यावर स्वाक्षरी व शिक्का नसणे.
३. कामासोबत सादर करावयाचे दाखले त्रोटक असणे. याकरीता आवश्यक दाखल्यांच्या नमूना यासोबत पाठविण्यात येत असून सदर नमून्यातच यापुढे दाखल्यांसह अंदाजपत्रके सादर करावीत.
४. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हददीत आस्थाविका अंतर्गत कामे इतर कार्यान्वयीन यंत्रणेमार्फत (सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व इतर) करण्यात येते असल्यास अशा वेळी सदर कार्यान्वयीन यंत्रणांनी स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना- हरकत प्रमाणपत्र जोडूनच कामाची अंदाजपत्रके सादर करावीत. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनीदेखील सदर कामाची ना-हरकत प्रमाणपत्र प्राथम्याने सदरील कार्यान्वीयन यंत्रणेस उपलब्ध करून दयावी.
५. निधी मागणी करतांनादेखील मागणीपत्रावर दिनांक, जावक क्रमांक स्वाक्षरी नसते. यास्तव निधी मागणी करतांना मा. आमदार महोदयांचे नाव, कामाचे नाव,प्रशासकीय मंजूरी क्रमांक, सदर कामास यापुर्वी प्राप्त निधी, त्यापैकी समर्पित निधी, काम पूर्णत्वाचा दाखला, कामाच्या ठिकाणची भौगोलिक परिसिमनांची छायाचित्रे(geo- tagging),संदर्भिय शासननिर्णयाच्या परिशिष्ठ क्र.४ मधील विहित नमुन्यातील फलकाचे छायाचित्र जोडून सादर करावीत.

सोबत- दाखल्यांचा नमुना

(वैभव कुलकर्णी)
जिल्हा नियोजन अधिकारी, ठाणे

कार्यान्वीयन यंत्रणेचे लेटरहेड

---

## जागा उपलब्ध असल्याबाबत, यापुर्वी इतर योजनेमधुन काम न घेतल्याबाबत व काम पूर्ण झालेनंतर देखभाल दुरूस्ती करण्याबाबत कार्यान्वयीन यंत्रणेने दयावयाचे प्रमाणपत्र

### प्रमाणपत्र

मा.आमदार श्री. **(आमदार महोदयांचे नाव)** . यांनी त्याचे **(मतदार संघाचे नाव)** या मतदार संघाकरीता प्रस्तावित केलेल्या काम- **(कामाचे नाव)** करीता खालीलप्रमाणे प्रमाणित करण्यात येत आहे.

१. या कामाकरीताची जागा ही शासन/ ग्रामपंचायत/ नगरपालीका/ नगरपरिषद/ नगरपंचायती/ जिल्हा परिषद/ महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिसा:रण/ म्हाडा यांचे मालकीची आहे.
२. हे काम इतर कोणत्याही योजनेतून यापुर्वी घेण्यात आलेले नाही
३. हे काम ग्रामपंचायत/ नगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायती/ जिल्हा परिषद/ महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिसा:रण/ म्हाडा या संस्थेमार्फत/ अभिकरणामार्फत घेण्यात येत असून, सदर काम पूर्ण झाल्यावर त्याची देखभाल/ परिरक्षण, ही/ हे ग्रामपंचायत/ नगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायती/ जिल्हा परिषद/ महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिसा:रण/ म्हाडा इत्यादी अभिकरण करण्यास तयार आहे.

सभामंडप/सभागृह याकरीता

४. सभामंडप प्रस्तावित करण्यात आलेल्या गावाची लोकसंख्या (शहरी भागाकरीता प्रभागाची लोकसंख्या)-- असून आज रोजी गावात असलेल्या सभामंडप/सभागृहांची संख्या ---- आहे.

प्राधिकरण प्रमुखाचे नाव.पदनाम, सही व शिक्का

दिनांक

ठिकाण